09-03-2025-Dai-02new_DH_PAN_28_04_2016-2.qxp 03/09/2025 12:24 AM Page 1



# इव्हेंट मॅनेजमेंटमध्ये विपुल संधी..!

## उद्योजक प्रवीण जेम्स : साखळी सरकारी महाविद्यालयात विशेष व्याख्यान

टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ८ :** सध्याच्या काळात 'इव्हेंट' हा प्रत्येकाच्या जगण्याचा भाग बनलेला आहे. इव्हेंटचे आयोजन करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था यांना प्रचंड मागणी असून इव्हेंट मॅनेजमेंट उद्योग म्हणून पुढे येत असल्याने या क्षेत्रात करिअरची विपुल संधी असून तरुणांनी पुढे यावे आणि या क्षेत्रात आपले करिअर घडवावे, असे प्रतिपादन उद्योजक, इव्हेंट मॅनेजमेंटमधील तज्ज्ञ आणि साखळी सरकारी महाविद्यालयाचे माजी सरचिटणीस प्रवीण जेम्स यांनी केले.

कला, विज्ञान आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालय, साखळी येथील वाणिज्य विभागाने आयोजित केलेल्या 'पदवीनंतर इव्हेंट मॅनेजमेंटमधील करिअरची संधी' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते.



**साखळी : मुख्य मार्गदर्शक प्रवीण जेम्स, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस, वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा. प्रशांत भोसले, व्याख्यानाचे संयोजक प्रा. कॉनराड डिसोझा व सहभागी विद्यार्थी.**

यावेळी मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस, वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा.प्रशांत भोसले, व्याख्यानाचे संयोजक प्रा. कॉनराड डिसोझा आदी मान्यवर उपस्थित होते.

गौरी माळी यांनी पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले. साईश राजपूत यांनी प्रमुख वक्ते प्रवीण जेम्स यांचा परिचय करून दिला. प्राचार्य नामदेव गावस यांनी उपस्थितांचे स्वागत केले. ऐश्वर्या मातोणकर यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार उर्वशी पंडित यांनी मानले. एकूण ५८ विद्यार्थी या व्याख्यानासाठी उपस्थित होते.

प्रवीण जेम्स म्हणाले की, इव्हेंट मॅनेजमेंटमध्ये तरुणांना करिअरची प्रचंड संधी आहे. या क्षेत्रात वेळला खूप महत्त्व असते. त्यामुळे वेळेचे नियोजन करता यायला हवे. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या जीवनातील वेगवेगळे अनुभव विशद केले. इव्हेंट मॅनेजमेंटमधील नवे ट्रेंड आणि यश याबद्दल प्रवीण जेम्स यांनी विद्यार्थ्यांना नवी दृष्टी दिली. कार्यक्रमाचे नियोजन आणि अंमलबजावणी, त्यासंदर्भातील कौशल्ये यावरही त्यांनी प्रकाशझोत टाकला.

> इव्हेंट मॅनेजमेंट विषयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे आयोजन आणि अंमलबजावणी करण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, विद्यार्थ्यांना इव्हेंट मॅनेजमेंटमधील करिअरची संधी आणि त्यासाठी आवश्यक कौशल्यांची माहिती प्राप्त व्हावी, यासाठी या विशेष व्याख्यानाचे आयोजन केलेले होते.
>
> – डॉ. नामदेव गावस
> प्राचार्य, कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय, साखळी

## पान १ वरून

### गोव्यात ११.६७ कोटींचा हायड्रोफोनिक गांजा जप्त

होता. त्याने गिरी आणि पेडणे येथे दोन अपार्टमेंट भाड्याने घेतली. स्थानिक स्तरावर तण विक्रीसाठी त्याने काही धावपटू आणि फेरीवाल्यांना नमुने वितरित करण्याचा प्रयत्न केला. मात्र, गुन्हे शाखेला याबाबत गुप्त माहिती मिळाल्याने त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवले गेले आणि गिरी अपार्टमेंटवर छापा टाकत १२ किलो हायड्रोफोनिक गांजा जप्त करण्यात आला

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गोव्यात हायड्रोफोनिक तणाची मागणी झपाट्याने वाढली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे हा अमली पदार्थ उच्च-शुद्धतेचा असून मिळणे कठीण आहे. आरोपी गौतम काही काळ गोव्यातील काही रेस्टॉरंटमध्ये बारटेंडर म्हणून काम करत होता. त्यादरम्यान, त्याला या तणाचा परिचय झाला आणि तो मोठ्या ड्रग्ज तस्करांच्या संपर्कात आला. गोवा पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणावर मौन बाळगलेअसून, पुढील तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. गुन्हे शाखेने गौतमविरोधात नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस ) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

या छाप्यात पोलिस निरीक्षक प्रशल देसाई, तुषार लोटलीकर, तसेच कॉन्स्टेबल सुशांत पागी, विशाल नाईक, इर्शाद वाटंगी, विराज खांडेपारकर आणि महाबळेश्वर सावंत यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. गोव्यातील अमली पदार्थांचा प्रसार रोखण्यासाठी पोलिसांनी आणखी कठोर पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# महिलांनी क्रीडा क्षेत्रातही योगदान द्यावे : डॉ शेट्ये

टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. ८ : महिलांनी सर्व क्षेत्रात पुढे येण्यासाठी तसेच आत्मनिर्भर होण्यासाठी विविध क्षेत्रात आपली प्रतिभा सिद्ध करावी. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात महिला प्रतिभावंत असून संसाराचा गाडा हाकतानाच त्यांना क्रीडा कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळावी या उद्देशाने खास महिलांसाठी क्रीडा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून एक वेगळा आनंद त्यांना अनुभवता येईल, असे प्रतिपादन आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांनी केले

भारतीय जनता पार्टी डिचोली व शिक्षा व्हिजन यांच्या विद्यमाने तीन दिवशीय महिला क्रीडा महोत्सवाचे आयोजन झांट्ये जिमखाना स्टेडियममध्ये करण्यात आले आहे.

**डिचोलीत महिला क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटन**

यावेळी भाजप मंडळ अध्यक्ष डॉ. कौस्तुभ पाटणेकर, सरपंच सुबत्ता सामंत, पांडुरंग नाईक, सत्यवान हरमलकर, दीपा शिरगावकर, गुंजन कोरगावकर, मानसी कवठणकर विनश्री गावकर, तृप्ती गाड. डॉक्टर बेतकीकर इतर पंच सदस्य तसेच सुमारे चारशे महिला खेळाडू उपस्थित होते

डॉक्टर कौस्तुभ पाटणकर यांनी आजची महिला आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीने कार्यरत असून क्रीडा क्षेत्रातही त्यांना आपले गुण सिद्ध करता यावेत, या उद्देशाने खास महिलांसाठी आयोजित क्रीडा मिळाला मोठा प्रतिसाद लाभला, याबद्दल आनंद व्यक्त केला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने उद्‌घाटन करण्यात आले तसेच नारळ वाढवून विविध मैदानांचांचे सभोषकरण करण्यात आले यावेळी लंगडी व इतर खेळाचे विविध गटात आयोजन करण्यात आले होते.

# साखळीत कामगार खाली पडून जखमी

टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ८ :** दिनकरनगर हरवळे – साखळी येथे बांधकाम सुरू असलेल्या एका इमारतीचे रंगकाम करणारा पेंटर खाली पडल्याने गंभीर जखमी झाला. खाली पडताच त्याच्या अंगात बाजूलाच काम सुरू असलेल्या अन्य एका बांधकामाच्या लोखंडी सळ्या घुसल्याने अडकून पडला. अखेर ग्राइंडर कटरच्या सहाय्याने सळ्या कापून बाहेर काढण्यात आले. ही घटना शुक्रवारी दुपारी घडली.

उपलब्ध माहितीनुसार, दिनकरनगर हरवळेतील या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील गॅलरीत रंगकाम करणारा उत्तरप्रदेश येथील व सध्या गोव्यात स्थायिक झालेला पेंटर थेट खाली पडला. काँक्रीटसाठी उभे करण्यात आलेल्या लोखंडी सळ्यांमध्ये तो अडकला. त्यांच्या हातात व पायात लोखंडी सळ्या घुसल्याने तो त्याच ठिकाणी अडकून पडला, अखेर लोखंडी सळ्या कापून त्याला बाहेर काढावे लागले. बाहेर काढल्यानंतर त्याला जखमी अवस्थेत साखळी सरकारी सामाजिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर त्याला बांबोळी येथे गोमेकॉ इस्पितळात पाठविण्यात आले. तेथे तात्काळ शस्त्रक्रिया करण्यात आली. या घटनेचा पंचनामा पोलिस उपअधीक्षक जिवबा दळवी व पोलिस निरीक्षक दिनेश गडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली केला. अधिक तपास डिचोली पोलिस करीत आहेत.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the general public that my clients **(1) MR. SARVOTTAM NARAYAN PHALDESAI,** son of Late Shri Narayan Phaldesai, holder of Aadhaar Card No. 309120191778, resident of House no. 214, Ashray, Nandanvan Residency, Patantali, Near Sneh mandir, Queula, Ponda, Ponda, North Goa, Goa, 403401, **(2) MRS. SUGANDHA SARVOTTAM PHALDESAI,** wife of Shri Sarvottam Phaldesai, holder of Aadhaar Card No. 539603165498, resident of House no. 214, Ashray, Nandanvan Residency, Patantali, Near Sneh Mandir, Queula, Ponda, Ponda, North Goa, Goa, 403401; by virtue of Revocation of Power of Attorney dated 07th March 2025 registered under Registration No. 615/2025, have revoked and cancelled all the powers and authorities entrusted to **SHRI UMESH NARAYAN PHAL DESAI,** major in age, son of Late Shri Narayan Phal Desai, holder of Aadhaar Card bearing no. 716701071899, resident of 1005. Parijat, Chinchwada, Tiswadi, Chimbel, Goa, Panaji, North Goa, Goa, 403006 under General Power of Attorney dated 27/10/2020 executed before Advocate and Notary Mr. G. K. Hegde Desai, South Goa, Govt. of Goa, registered under No. 3173/2020 dated 27/10/2020 hence forth my clients are not responsible for any act/s done on their behalf in pursuance of the said General Power of Attorney by the said person/s.

Sd/- **Adv. Preeti P. P. Agrasani**
Office no. 309, Reliance Magnum,
Third Floor, above Navtara Restaurant
Opposite K. T. C. Bus stand,
Madel, Margao, Goa

**OFFICE OF THE MAMLATDAR TISWADI TALUKA, PANAJI GOA**
**Mutation Case No.**
**COMP/Mutation/43358/Cumbarjua**

1. Suryakant Maddu Naik,
R/o. H. No. 466, Gawant Mala Wada, Cumbarjua, Tiswadi, Goa. …Applicants
V/S
1. Dr. Inacio Pio Jesus De Sa 2. Maria De Carmo Rita Socorro Ferreira Rangel e Sa 3. Savio Ligorio Franklin Francisco Filomeno De Sa 4. Fatima Pinto De Sa 5. Lucio Maria Danilo Filomeno De Sa 6. Eunice De Jesus Fernandes De Sa 7. Madhu Babli Naik 8. Mahesh Maddu Naique alias Mahesh Maddu Naik 9. Manisha Mahesh Naique alias Manisha Mahesh Naik 10.Dinesh Mahadev Naik 11.Dipika Dinesh Naik …. Opponent

To the opponents/ their unknown legal heirs

**PUBLIC NOTICE**

Application received from Suryakant Maddu Naik R/ o. H. No. 466, Gawant, Malawada, Cumbarjua. Requesting there in to include the name of Suryakant Maddu Naik, in the Occupant Column of foFm I & XIV under Sy. No. 41/1 of Village Cumbharjua of Tiswadi Taluka, in plot no.91-A, an admeasuring area of 435 sq. mts., as the applicant having acquired right of the property, as per Deed of Gift Reg. No. PNJ-1-3228-2024 dated 29-10-2024 before in the Office of the Sub-Registrar, Tiswadi, Panaji, Goa and as per Deed of Sale Reg. No. 1401 dated 16-06-2003 at pages 273 to 307, Volume no. 1203 before in the Office of the Sub-Registrar, Tiswadi, Panaji, Goa and also as per Will dated 12-01-1973, Book No. 37, Page 41-V before in the Civil Registrar Cum Sub-Registrar and Notary Ex-Officio, Panaji, Ilhas, Goa.

And whereas the notice in the Form X (Under rule 10) of the L.R.C. 1968 issued to the opponents at the last known address return unserved back with postal remark "Party Expired" unserved as the applicant does not known the detail addresses of the legal heirs of the opponents and their further addresses.

And whereas the applicant has prayed vide his application dated 25/02/2025 for substituted service, by publication of public notice in any one daily newspaper as required under order V rule 20 (1 A) of C. P. C. 1908 as the applicant does not know the detail legal heirs of the deceased nor their addresses.

Now, therefore, if any person having any objection to the above said mutation entry are called upon and to submit their objection to me either orally or in writing within fifteen days from the date of publication of this notice.

Please note that if No Objection is received by me within said period of fifteen days, it shall be presumed that they agree to the mutation, entry. The mutation will be certified on any other days after the above period is over.

**Place: Panaji Date: 03.03.2025**
**Sd/- ( Priya Kamat @ Samant )**
**Joint Mamlatdar- IV of Tiswadi, Panaji-Goa.** SEAL

**OFFICE OF THE MAMLATDAR TISWADI TALUKA, PANAJI GOA**
**Mutation Case No.**
**COMP/Mutation/43898/Cumbarjua**

1. Nirmala Xabi Vaigankar,
R/o. H. No. 466, Gawant Mala Wada, Cumbatjua, Tiswadi, Goa. ….Applicants
V/S
1. Dr. Inacio Pio Jesus De Sa 2. Maria De Carmo Rita Socorro Ferreira Rangel e Sa 3. Savio Ligorio Franklin Francisco Filomeno De Sa 4. Fatima Pinto De Sa 5. Lucio Maria Danilo Filomeno De Sa 6. Eunice De Jesus Fernandes De Sa …Opponent

To the opponents/ their unknown legal heirs

**PUBLIC NOTICE**

Application received from Nirmala Xabi Vaigankar R/o. H. No. 466, Gawant, Mala-waddo, Cumbarjua. Requesting there in to include the name of Nirmala Xabi Vaigankar, in the Occupant Column of form I & XIV under Sy. No. 41/1 of Village Cumbharjua of Tiswadi Taluka, Plot no. 83 an admeasuring area of 314.75 sq. mts., as the applicant having acquired right of the property, as per Deed of Ratification Reg. No. PNJ-BK1-00068-2012 dated 06-01-2012 before in the Office of the Sub-Registrar, Tiswadi, Panaji, Goa, and as per Deed of Sale Reg. No. 18 dated 05-01-1981 Pages 01 to 05, Book no. I, Vol no. 166 before in the Office of the Sub-Registrar, Tiswadi, Panaji, Goa and also as per Will dated 12-01-1973, Book No. 37, Page 41-V before in the Civil Registrar Cum Sub-Registrar and Notary Ex-Officio, P&naji, Ilhas, Goa.

And whereas the notice in the Form X (Under rule 10) of the L.R.C. 1968 issued to the opponents at the last known address return unserved back with postal remark "Party Expired/Return unserved" unserved as the applicant does not known the detail addresses of the legal heirs of the opponents and their further addresses.

And whereas the applicant has prayed vide his application dated 25/02/2025 for substituted service, by publication of public notice in any one daily newspaper as required under order V rule 20 (1 A) of C. P. C. 1908 as the applicant does not know the detail legal heirs of the deceased nor their addresses.

Now, therefore, if any person having any objection to the above said mutation entry are called upon and to submit their objection to me either orally or in writing within fifteen days from the date of publication of this notice.

Please note that if No Objection is received by me within said period of fifteen days, it shall be presumed that they agree to the mutation, entry. The mutation will be certified on any other days after the above period is over.

**Place: Panaji Date: 03.03.2025**
**Sd/- ( Priya Kamat @ Samant )**
**Joint Mamlatdar- IV of Tiswadi, Panaji-Goa.** SEAL

# व्यक्तिमत्व आणि आत्मविश्वास विकासवर पार्सेकर महाविद्यालयात कार्यशाळा

टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ८ :** गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व आणि आत्मविश्वास विकास या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळा एज्युकेशन सर्कल आणि आर्ट क्लब यांच्या सहयोगातून झाली. या कार्यशाळेस विषय तज्ज्ञ अरुंधती चट्टोपाध्याय यांचे मार्गदर्शन लाभले.

पार्सेकर महविद्याल्याच्या ज्ञानदा सभागृहात ही कार्यशाळा झाली.



**हरमल : पार्सेकर महाविद्यालयात व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेत प्रा. अरुंधती चट्टोपाध्याय. सोबत प्रा डॉ पांडुरंग पंडित व प्रा. यादुप्रभा यादव.**

अरुंधती चट्टोपाध्याय यांनी विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले. त्यांच्यातील सुप्तगुणांना वाव मिळेल यासाठी अधिकाधिक संधी दिल्या. दिवसभरात दोन सत्रांमध्ये कार्यशाळा पार पडली. समुह भावना, सहकार्य, स्वावलंबन, आत्मविश्वास अशा विविध गुणांचा परिपोष करण्यास उपयुक्त उपक्रम झाले. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरली, असे सांगितले. कार्यशाळेच्या प्रमुख पाहुण्यांचे स्वागत प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडित यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यदुप्रभा यादव यांनी केले. कार्यक्रमास प्रा. रेणुका परदेशी, डॉ. दुर्गेश माजिक, प्रा. प्रितेश नाईक, प्रा. वैशाली नेवगी, प्रा. सागर डवरी, डॉ. आसावरी अष्टेकर, डॉ. राजीव पंचम, प्रा. दत्ताराज च्यारी आणि प्रा. सीएना फर्नांडिस आदी उपस्थित होते.

# कवळेतील सरस्वती विद्यालयात बाजार डे उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. ८ :** कवळे येथील श्री सरस्वती प्राथमिक विद्यालयात 'बाजार डे ' उत्साहात साजरा करण्यात आला.इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांतर्फे विद्यालयाच्या सभागृहात बाजार भरविण्यात आला.

विद्यार्थ्यांना व्यापार, व्यवसाय, खरेदी विक्रीचा प्रत्यक्ष अनुभव यावा तसेच व्यवहारिक ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने दरवर्षी बाजार डे आयोजित करण्यात येतो.हायस्कूलचे मुख्याध्यापक सुदेश पारोडकर यांच्या हस्ते फीत कापून बाजार डे चे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका माधवी कपिलेश्वरकर, शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी विक्री करण्यासाठी विविध प्रकारच्या भाज्या, फळे, नारळ, विविध खाद्यपदार्थ उपलब्ध केले होते. पालक व शिक्षकांनी विविध वस्तूंची खरेदी केली.

**CHANGE OF NAME**

I, **IGNATIUS ANTHONY EUSEBIUS DE MELO,** Resident of H. No. 5/91 B, Umta Vaddo, Calangute, North Goa, 403516, Goa, India, would like to change my name from **IGNATIUS ANTHONY DE MELO,** to **IGNATIUS ANTHONY EUSEBIUS DE MELO,** according to my Birth Certificate.

Hereafter in all my dealings and documents I will be known by my name **IGNATIUS ANTHONY EUSEBIUS DE MELO.**

**Office of the Civil Registrar-Cum-Sub Registrar, Mormugao, Goa.**
Shop No. 1 & 2, Karma Empress Building, Ground Floor, Near KTC Bustand, Vasco da Gama, Goa.
Telephone No.9405864461

No. CR/SR/MOR/197/2025 Dated: 06/03/2025

**Office of the Civil Registrar-Cum-Sub Registrar and Special Notary Shri. Tushan Gurudas Kunkolienkar, Civil Registrar-Cum-Sub Registrar and Special Notary in the said Judicial Division.**

In accordance with the section 346(11) of "The Goa Succession Special Notaries and Inventory Proceeding Act, 2012", it is hereby made public that by a **Deed of Succession Cum Relinquishment** dated 06/03/2025, drawn by and before me Shri. Tushan Gurudas Kunkolienkar, **Civil Registrar-Cum-Sub Registrar and Special Notary, Mormugao at Vasco-da-Gama, at pages 34 to 38 of Notarial Book No. 204 of this office**, the following is recorded:

That on 12/05/1991, at G.M. College, Panjim, expired Rosario Catarino Pereira and his wife on 02/05/1999, at Vishwa Sanjivani Health Centre, Vasco da Gama, Goa, expired Isabel Pereira, both intestate without any will or gift or any other testamentary disposition of their last wish but leaving behind their five children, namely, (one) Socorro Joaquim Sebastiao Pereira married to Inacia Estibeiro, (two) Antonio Francisco Pereira married to Esperanca Ribeiro, (three) Mariano Pereira married to Maria Jane Dias, (four) Marcel Cruz Pereira married to Rosaria Marques and (five) Assis Claudio Pereira, unmarried, as their "Sole and Universal heirs". That Mr. Socorro Joaquim Sebastiao Pereira alongwith his wife Inacia Estibeiro, by this deed voluntarily and freely cede, release, renounce and relinquish all their illiquid and undivided rights in the estate of their father/father-in-law late Rosario Catarino Pereira, who died on 12/05/1991, at G.M.College, Panjim and their mother /mother-in-law Isabel Pereira who died on 02/05/1999, at Vishwa Sanjivani Health Centre, Vasco da Gama, Goa, which assignment they do so in favour of the remaining co-heirs, under the precise terms of the Goa succession and Inventory Proceedings Act, 2012 under section 30. The said Antonio Francisco Pereira alongwith his wife Esperanca Ribeiro, Mariano Pereira alongwith his wife Maria Jane Dias, Marcel Cruz Pereira alongwith his wife Rosaria Marques and Assis Claudio Pereira, as their "Sole and Universal heirs". And besides them, there being no one else in terms of law of succession still in force in this state of Goa who may prefer or concur along with them to the inheritance left by the said deceased persons.

**Any person having objection to this deed may file their objection in this office within one month from the date of its publication.**

Place: Mormugao-Goa.
Dated: 06/03/2025
Sd/-
Seal (Tushan Gurudas Kunkolienkar)
Special Notary, Mormugao

Sandeep Ads




**कवळे : श्री सरस्वती विद्यालयाच्या 'बाजार डे ' च्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित सुदेश पारोडकर, माधवी कपिलेश्वरकर, पालक व विद्यार्थी.**

# तुयेच्या आत्मविश्वास स्कूलचे राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत यश

टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ८ :** अखिल गोवा आर्ट मास्टर असोसिएशन आयोजित डी डी दलाल चाईल्ड आर्ट ड्रॉइंग व कला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष व नियमित विद्यार्थ्यांच्या स्पर्धेत तुये येथील आत्मविश्वास स्कूलने घवघवीत यश संपादन केले.

या विद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. यात रुचिरा गावडे, अनुप परब, रितेश राऊळ, रॉस रॉड्रिग्ज व आयुष हळदणकर यांनी यश मिळवले. रुचिरा गावडे हिला द्वितीय बक्षीस व अनुप परब याला तृतीय बक्षीस देण्यात आले. बक्षीस प्राप्त विद्यार्थ्यांना शिक्षिका विश्रांती वेळीप हिचे मार्गदर्शन मिळाले. संस्थेच्या विशेष विद्यार्थ्यांत आत्मविश्वास जागवण्याचे कार्य तसेच समाजातील विशेष विद्यार्थ्यांना सामावून घेत, त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे ज्ञान दान करीत आहेत, त्यासाठी मेहनत व परिश्रम घेत असल्याबद्दल शिक्षक वर्गाचे अभिनंदन असल्याचे मत प्रभारी सुजाता गावडे यांनी व्यक्त केले.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आत्मविश्वासचे संस्थापक अध्यक्ष सीताराम गावडे, संचालक विवेक बोडके, व्यवस्थापक योगेश राऊत, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष अनघा जोशी व पालक शिक्षक संघाने अभिनंदन केले आहे.

# म्हापशात १९ पासून शिमगोत्सवाची धूम

## समित्यांची निवड : अध्यक्षपदी जोशुआ डिसोझा यांची निवड

टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ८ :** गेली ४६ वर्षे म्हापसा शिगमोत्सव मंडळ म्हापसा शहरामध्ये शिमगोत्सव साजरा करत आहे. यावर्षी दि. १९ ते २३ मार्च या कालावधीत शिमगोत्सव साजरा करण्यात येणार असून त्यासाठी पुढीलप्रमाणे समिती निवडण्यात आलेली आहे. अध्यक्ष: जोशुआ डिसोझा, उपसभापती तथा आमदार जोशुआ डिसोझा यांची भेट घेतल्याची चर्चा आहे.

इतर समिती पुढीलप्रमाणे : उपाध्यक्ष : आनंद भाईडकर, चंद्रशेखर बेनकर, बार्बरा कॅरास्को, शशांक नार्वेकर, नूतन बिचोलकर, विकास आरोलकर, कायल ब्रागांझा, शुभांगी वायगणकर, किशोरी कोरगावकर, आशीर्वाद खोर्जुवेकर, कमल डिसोझा, स्वप्नील शिरोडकर, विराज फडके, अन्वी कोरगावकर, सुधीर कांदोळकर, प्रकाश भिवशेट,

चिटणीस : साईनाथ राऊळ, उपचिटणीस : सुशांत हरमलकर

६. खजिनदार: यशवंत गवंडळकर, ७. उप– खजिनदार:दिनेश पानकर

सल्लागार समिती: राजेंद्र ग. पानकर, प्रसन्ना बुर्ये, मोहन पु. काणेकर, दामोदर (बाबू) नाटेकर, विलास पानकर, , अवधूत स. नार्वेकर, महादेव सा. नाटेकर, अनिल भर्तू, शिवानंद म. धावजेकर, सुशांत पेडणेकर.

सदस्य: अजित मांद्रेकर,सागर श्री. नार्वेकर, अच्युत वेर्णेकर, रमेश रा. शेटमणेरकर, सुहास सिरसाट, अभी गवंडळकर, सागर गो. नाईक, विनायक दिवकर, भालचंद्र नाटेकर, संजय, मिशाळ, महेश भिवशेट, सोमनाथ नाईक, विशांत पानकर, विवेक नाटेकर, सोमनाथ नाटेकर, निळकंठ शेट, मिलिंद महाले,रवींद्र फोगेरी , भारत तोरस्कर, दत्ताराम (बाप्पा) नाटेकर, कुंदल नाटेकर, हर्षद स्वार, सलील शिरोडकर, यशवंत शेट्ये, रोहित नाटेकर, उदय मुंज, गुरुदास वायगणकर, श्यामसुंदर पेडणेकर अनिश जोशी, संदेश सिरसाट, नितीन पेडणेकर, राजेश शेट्ये, दुर्गेश तिनळेकर, गौरीश पेडणेकर, सिद्धांशु साळवी, राजेश तुयेकर, सिद्धांत परब, सिद्धार्थ बोरकर, संप्रेष कळंगुटकर, पूर्णय रिवणकर, श्रेयश वराडकर, संदेश रेडकर, प्रथमेश वायगंणकर, भावेश आरोलकर, साईश सावंत, प्रज्योत खेडेकर, योगेश खेडेकर दीपक म्हाडेश्री

प्रसिद्धी समिती: प्रकाश धुमाळ, नारायण राठवड, सुदेश आर्लेकर, रमेश नाईक, तुषार टोपले, अनिल लाड, गिरीश मांद्रेकर, प्रसाद म्हाम्बरे, आग्नेल परेरा, उमेश झर्मेकर, रेणुका तालेगावकर , अर्पिता श्रीवास्तव, संदीप कामूलकर, प्रसाद पिंगुळीकर, शामसुंदर फडते, बाबू पिंगुळीकर, योगेश मिराशी, रमेश नाईक, कमलाकर हुमरस्कर, प्रकाश गडेकर, सौरव शिरोडकर, गौतम शिरोडकर, डॅनव्हर डिसोझा, भारत बेतकेकर, नितिक्षा गावकर, अस्मिता पोळजी, साईप्रसाद कुबडे, सागर लवंदे, स्नेहा हसोटीकर. म्हापसा शिगमोत्सव मंडळ आयोजित, पर्यटन खाते, गोवा सरकार पुरस्कृत आणि म्हापसा नगरपालिकेच्या सहकार्याने यंदा शिमगोत्सवाचे विविध कार्यक्रम दि. १९ ते २३ मार्च या दरम्यान आयोजित करण्यात आले आहेत. दि. १९ रोजी म्हापसा टॅक्सी स्टँण्डवर उभारण्यात आलेल्या भव्य मंचावर संध्याकाळी ६ वाजता 'रंगोत्सव' साजरा करण्यात येईल. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गोवा विधानसभेचे उपसभापती आणि म्हापसा मतदारसंघाचे आमदार पीटर डिसोझा, तर सम्मानानीय अतिथी म्हणून म्हापसा पालिकेच्या नगराध्यक्ष प्रिया मिशाळ उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन कार्यक्रमानंतर 'ब ' गटातील वेशभूषा स्पर्धा व डान्स ऑन रेकॉर्ड या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या दोन्ही स्पर्धांसाठी वयोमर्यादा ६ ते १५ वर्षापर्यंत निर्धारित करण्यात आली आहे. या स्पर्धांसाठी इच्छुक स्पर्धकांनी आपली नावे सायंकाळी ५ पर्यंत कार्यक्रमाच्या ठिकाणी ( दक्षा / स्नेहा ) यांच्याकडे नोंद करावी. या प्रत्येक स्पर्धेसाठी पहिल्या १५ स्पर्धकांना भाग घेता येईल. दि. २० रोजी द बँड रॉकर्स हा ऑर्केस्ट्रा सायंकाळी ६.३० वाजता म्हापसा टॅक्सी स्टॅण्डवर आपला कार्यक्रम सादर करणार आहेत. दि.२१ रोजी कणकवली येथील रंगखांब ग्रुप निर्मित विविध लोककलांचा बहारदार कार्यक्रम सायंकाळी ६.३० वाजता म्हापसा टॅक्सी स्टँडवर सादर करण्यात येईल. दि. २२ रोजी महाराष्ट्र संगीत रत्न – सह्याद्री वाहिनी विजेता, सारेगमप – झी मराठी विजेता, सूर नवा ध्यास नवा – कलर्स वाहिनी विजेता अनिरुद्ध जोशी यांचा गाणे मनातले..... हा कार्यक्रम टॅक्सी स्टॅण्डवर संध्याकाळी ६.३० वाजता सादर करण्यात येईल. दि. २३ रोजी सिने अलंकार जवळील राष्ट्रोळीकडून नमन करून शिमगोत्सव मिरवणुकीला (चित्ररथ, रोमटामेळ, लोकनृत्य व अ गट फॅन्सी ड्रेस स्पर्धा ) ३.३० वाजता सुरुवात होऊन जुन्या आझिलो हॉस्पिटल शेजारून, म्हापसा मार्केट समोरून जाऊन गांधी चौक येथे संपन्न होणार आहे. सर्व स्पर्धकांना पथकांना नियोजित वेळेत आपली कला सादर करावी. जे स्पर्धक/पथक वेळेत आली कला सादर करण्यास अपयशी ठरेल, त्यांना स्पर्धेतून बाद ठरविण्यात येईल. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रात्री १० वाजता सर्व स्पर्धा संपन्न झाल्या पाहिजेत. म्हापसा शिमगोत्सव मंडळाच्या खालील सदस्यांनी चित्ररथ, रोमटामेळ, फॅन्सी ड्रेस ( अ – गट ) आणि लोकनृत्य पथकांना हाताळण्याची जबाबदारी घेतली आहे. चित्ररथ : अनिष जोशी आणि सहकारी, रोमटामेळ : प्रज्योत खेडेकर आणि सहकारी, फॅन्सी ड्रेस ( अ – गट ) आणि लोकनृत्य – अमेय कोरगावकर आणि सहकारी, तसेच, अच्युत वेर्णेकर आणि त्यांचे सहकारी प्रत्येक स्पर्धकाकडून प्रवेशिका स्वीकारून त्यांना स्पर्धक क्रमांक देण्याची जबाबदारी हाताळतील.

**पाहिजेत**

**Wanted Counter sales boys and sales girls** staying in and around Panjim, Pls. Contact Tel. Nos. 9011937381